**महाराष्ट्र शासन**
**आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**
**DIRECTORATE OF AYUSH, MAHARASHTRA STATE, MUMBAI.**
**शासकीय दंत महाविद्यालय आणि रुग्णालय इमारत, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**
4th Floor, Government Dental Collage & Hospital Building, St.George Compound, D' mello Road, Mumbai - 01.
कार्यालय - दुरध्वनी व फॅक्स - ०२२-२२६२६००७ संचालक : ०२२-२२६२२२४७
ई-मेल : directorayurvedmaha@gmail.com वेबसाईट : www.mahayush.gov.in

क्र.आसं/PG-Ayu-प्रवेश-२०१८/AMAMC/पदव्यु.प्रवेश/२०१९/आयु-२ दिनांक : 13 FEB 2019

अत्यंत महत्वाचे / तातडीचे / कालमर्यादा

प्रति,
अध्यक्ष,
असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ आयुर्वेदीक मेडिकल कॉलेजेस,
महाराष्ट्र

विषय - **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ - आयुर्वेद पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाबाबत**

संदर्भ - या संचालनालयास दि.११-२-२०१९ रोजी ई मेल द्वारे पाठविलेले आपले पत्र क्र. AMAMCM/४६/२०१९, दि.०९-२-२०१९

उपरोक्त विषयाचे संदर्भित पत्रान्वये, आपण, आपले असोसिएशन मार्फत् राबविण्यात येत असलेल्या आयुर्वेद पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाचे वेळापत्रक पाठविले असून सदर प्रवेशप्रक्रीयेकरिता निरीक्षक पाठविण्याची विनंती केली आहे.

याबाबत आपले माहितीस्तव नमूद करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०१-२-२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये, पदवी अभ्यासक्रमाचा उल्लेख असून पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेशाबाबतचा उल्लेख दिसून येत नसल्यामुळे, मा.सवोच्च न्यायालयाचे आदेश हे "पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी" लागू असल्याचे दिसून येत नाही. सदर वस्तुस्थिती पहाता, आपण,सदर पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रीयेचे वेळापत्रक कशाचे आधारे विहीत केले आहे, याचा बोध होत नाही. यास्तव, आपणास कळविण्यात येते की, ज्या आदेशानुसार आपण पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश प्रकीया राबवित आहेत, त्या आदेशाची प्रत त्वरित या संचालनालयास उपलब्ध करुन दयावी. त्याचप्रमाणे, मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०१-२-२०१९ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने सुधारित आदेश दिलेले आहेत, हे आपले निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

आपले, आयुर्वेद पदवी अभ्यासक्रमाच्या जाहिरात/वेळापत्रकामध्ये, आपण, लो.रा.पाटील आयुर्वेद महाविद्यालय, इस्लामपूर, सांगली या महाविद्यालयाचा समावेश केलेला आहे. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार दि.१५-११-२०१८ रोजी रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश करावयाचे असून, सदर महाविद्यालयास शासनाने शासन निर्णय क्र.पीजीए १२१७/प्र.क्र.२६५/१७/शिक्षण-२, दि.२६-११-२०१८ अन्वये तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.MUHS/PB/UG/P-३/First/II/११८८/२०१८, दि.०४-१२-२०१८ अन्वये ६० वरुन १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस मंजुरी दिली आहे, यास्तव सदर बाब पहाता संबंधित महाविद्यालयाच्या



NEET UG 2018

वाढीव जागांवर विद्यार्थी प्रवेश करावयाचे आहेत किंवा कसे याबाबत, सक्षम प्राधिकारी तथा मा.आयुक्त, राज्य सीईटी कक्ष, मुंबई यांचे परवानगीची आवश्यकता आहे, हे आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

Sude

( वैद्या श्रध्दा सुडे )
सहाय्यक संचालक आयुष,
आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत - माहिती व यथायोग्य कार्यवाहीस्तव -
१) मा.आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सीईटी कक्ष, मुंबई
२) उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग (शिक्षण-२), मंत्रालय, मुंबई